M T W T F S
Date : / /
Page No:

२०१३-२०१४
वाङमय मंडळ मिटींग.

२५।०६।२०१३

आज दि. २५ जून २०१३ रोजी मराठी वाङमय मंडळाची बैठक महाविद्यालयातील इंग्रजी विभागात संपन्न झाली. बैठकीस खालील सदस्य उपस्थित आहेत.

१) प्रा. सरोजिनी खैरनार मराठी विभाग
२) प्रा. एस. डी. अहिर हिंदी विभाग.
३) प्रा. शितल डंगळे मराठी विभाग.
४) प्रा. आर. बी. शिंदे इंग्रजी विभाग.

या शैक्षणिक वर्षात वाङमय मंडळांतर्गत विविध उपक्रम राबविणेबाबत चर्चा झाली. वाङमय मंडळाचे उद्घाटन पुढील महिन्यात करावे असे ठरले. उद्घाटनासाठी प्रमुख अतिथी यशवंतराव चव्हाण मु. मुक्त विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रमेश वरखेडे यांचे नाव निश्चित करण्यात आले.

वाङमय मंडळांतर्गत रसिका क्लब चालविण्यात येतो त्यात विविध चित्रफिती, नाटक, चित्रपट दाखविण्याचे ठरले. तसेच अक्षरगंगा ही भित्तीपत्रिका विद्यार्थ्यांच्या कथा, कविता, भाषिक कौशल्ये यावर भर इ. साठी खुले व्यासपीठ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचे ठरले.

तसेच वाङमय मंडळातर्फे काव्यस्पर्धा, अक्षरलेखन, वक्तृत्व स्पर्धा, गीतगायन आदि स्पर्धा वर्षभर राबविण्याचे चर्चेद्वारे ठरले.

प्रा. सरोजिनी खैरनार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. श्रीम. अहिर, प्रा. आर बी. शिंदे यांनी चर्चा केली प्रा. शितल डंगळे यांनी आभार मानले व बैठक समाप्त झाली.

Patil
प्राचार्य
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
ओझर(मिग) ता. निफाड, जि नाशिक

प्रा. आर. बी. शिंदे
English

प्रा. एस. डी. अहिर
Hindi

सरोजिनी खैरनार
मराठी